Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing… Date: 10/05/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष



## लेखक, गीतकार जगदीश खेबुडकर

जगदीश खेबुडकर हे मराठी चित्रपटसृष्टीतील लेखक आणि गीतकार होते. त्यांचा जन्म १० मे १९३२ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील हळदी गावात झाला. त्यांनी पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातून साहित्यात कला शाखेची पदवी प्राप्त केली, जिथे त्यांचा मराठी साहित्यिकांशी व्यापक परिचय झाला. खेबुडकरांना लहानपणापासूनच कला, विशेषतः संगीत आणि साहित्याची आवड होती. वयाच्या १६ व्या वर्षी त्यांनी १९४८ मध्ये महात्मा गांधींच्या हत्येनंतर त्यांची पहिली कविता लिहिली. ती ऑल इंडिया रेडिओ आणि दूरदर्शनवर प्रसारित झाली.

खेबुडकर हे भजन, गझल आणि हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतात पारंगत होते आणि त्यांनी आपल्या जादुई कामगिरीने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. पिंजरा, साधी माणसं, सामना, चंद्र होता साक्षीला आणि अष्टविनायक यासारख्या चित्रपटांमधील गाण्यांसाठी ते ओळखले जातात. इ.स. १९६० मध्ये त्यांचे पहिले चित्रगीत आणि पहिली लावणी मला हो म्हणत्यात लवंगी मिरची प्रदर्शित झाली. 'रंगल्या रात्री अशा' या चित्रपटाची गीते लिहिण्याची ही संधी त्यांना वसंत पवार यांनी दिली होती. 'साधी माणसं', 'आम्ही जातो आमच्या गावा','कुंकवाचा करंडा' आदी चित्रपटांसाठीची त्यांची गीते अतिशय गाजली. साडेतीन शक्तिपीठांचे वर्णन करणारे 'दुर्गा आली घरा' हे सर्वात मोठं १६ मिनिटे कालावधीचे गाणे खेबुडकर यांनी लिहिले आहे. १९६० पासून त्यांनी ३०० चित्रपटांमध्ये २५०० गाणी लिहिली. तसेच त्यांनी ३५०० कविता, २५ कथा आणि पाच नाटकेदेखील लिहिली. जगदीश खेबुडकर यांचे ३ मे २०११ रोजी निधन झाले.

Nashik Edition

May 10, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * YEOLA DIST. NASHIK * CENTRAL LIBRARY

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401